08 DEC 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

स्तनाच्या कर्करोग उपचारांसाठी चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती

डॉ. गजानन राशीनकर, डॉ. प्रज्ञा पाटील यांच्या संशोधनाला यश

। कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधक प्राध्यापक डॉ. गजानन राशीनकर आणि डॉ. प्रज्ञा पाटील यांनी स्तनाच्या कर्करोगावरील 'हाइपरथर्मिया' या महत्त्वाच्या उपचारांसाठी आवश्यक असणाऱ्या चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. त्यांच्या या संशोधनाला भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय युके पेटंटही प्राप्त झाले आहे.

डॉ. राशीनकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, नॅनो-मॅग्नेटाइटच्या अतिसूक्ष्म रेणूवर विविध रासायनिक अभिक्रिया करून त्यावर एन-हेटेरोसायक्लिक कार्बिनचे (एन.एच.सी.) आवरण चढविण्यात येते आणि त्याची सोने या धातूसोबत प्रक्रिया करून या चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. हे चुंबकीय नॅनो कण कर्करोगावरील 'हाइपरथर्मिया' या उपचार पद्धतीमध्ये अतिशय प्रभावीपणे वापरले जाऊ शकतात.

चुंबकीय नॅनो कणांच्या विशिष्ट संरचनेमुळे ते स्तनाच्या कर्करोगकारक पेशींना जोडले जातात. अशा जोडल्या गेलेल्या नॅनो कणांवर जेव्हा चुंबकीय बल टाकले जाते, तेव्हा सतत बदलत जाणाऱ्या चुंबकीय लहरींच्या प्रभावामुळे हे कण उष्णता उत्सर्जित करतात. या प्रक्रियेदरम्यान साधारणपणे ४० ते ४८ अंश सेंटीग्रेड इतके तापमान निर्माण होते. यामुळे कर्करोगांच्या पेशींची अंतर्गत रचना ढासळते आणि त्या नष्ट होतात. विशेष बाब म्हणजे हे नॅनोकण कर्करोगाच्या गाठीला रक्तपुरवठा करणाऱ्या विविध रक्तवाहिन्यांची वाढ थांबवण्यासाठी देखील उपयुक्त ठरतात. या प्रक्रियेदरम्यान सर्वसाधारण पेशींना फार मोठ्या प्रमाणावर अपाय न करता केवळ स्तनाच्या कर्करोगांच्या पेशी नष्ट करण्याकरिता या नॅनो कणांचा प्रभावी उपयोग होतो. हे संशोधन एन-हेटेरोसायक्लिक कार्बिन आणि मुलभूत धातूंपासून नवनवीन नॅनो कणांची निर्मिती करणाऱ्या संशोधन क्षेत्राला दिशादर्शक स्वरुपाचे ठरणार आहे, असेही डॉ. राशीनकर यांनी सांगितले.

> शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी अलीकडील काळात केलेले संशोधन आणि त्यांना प्राप्त झालेले पेटंट यांची क्षेत्रे पाहता ती विद्यापीठाचा समाजोपयोगी संशोधनाचा वसा आणि वारसा सिद्ध करणारी आहेत. डॉ. राशीनकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे संशोधनही याच स्वरुपाचे आहे.
>
> **- डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू.**

या संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. पद्मा दांडगे, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. विश्वजीत खोत आणि डॉ. अर्पिता तिवारी यांनीही मोलाचे योगदान दिले.

या संशोधनासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.

0 8 DEC 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. राशीनकर, पाटील यांच्या संशोधनास युके पेटंट

स्तनांच्या कर्करोगावरील उपचारांसाठी चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. गजानन राशीनकर व डॉ. प्रज्ञा पाटील यांनी स्तनांच्या कर्करोगावरील 'हाइपरथर्मिया' उपचारांसाठी आवश्यक चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती करण्यात यश मिळवले आहे. या संशोधनाला भारतीय व आंतरराष्ट्रीय युके पेटंटही मिळाले आहे.

प्रा. डॉ. राशीनकर

डॉ. प्रज्ञा पाटील

> विद्यापीठाच्या संशोधकांनी अलीकडे केलेले संशोधन व त्यांना मिळालेले पेटंट पाहता विद्यापीठाचा समाजोपयोगी संशोधनाचा वसा व वारसा सिद्ध करणारी आहेत. डॉ. राशीनकर व त्यांच्या सहकाऱ्यांचे संशोधन याच पठडीतले आहे. कर्करोगावरील संशोधनाच्या क्षेत्रामधील मूलभूत संशोधनाला व भावी संशोधनाला त्यातून चालना मिळेल.
> **-डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

डॉ. राशीनकर म्हणाले, 'त्यांच्या संशोधनातील माहितीनुसार, नॅनो-मॅग्नेटाइटच्या अतिसूक्ष्म रेणूवर विविध रासायनिक अभिक्रिया करून त्यावर एन-डेटेरोसायक्लिक कार्बिनचे (एन. एच. पी.) आवरण चढविण्यात येते. त्याची सोने धातूसोबत प्रक्रिया करून या चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती होते. ते कण कर्करोगावरील हाइपरथर्मिया उपचार पद्धतीत प्रभावीपणे वापरले जाऊ शकतात. कणांच्या विशिष्ट संरचनेमुळे ते स्तनाच्या कर्करोगकारक पेशींना जोडले जातात. नॅनो कणांवर चुंबकीय बल टाकले जाते, तेव्हा सतत बदलत जाणाऱ्या चुंबकीय लहरींच्या प्रभावामुळे ते कण उष्णता उत्सर्जित करतात. या प्रक्रियेदरम्यान सुमारे ४० ते ४८ अंश सेंटिग्रेड इतके तापमान निर्माण होते. त्याने कर्करोगांच्या पेशींची अंतर्गत रचना ढासळते व त्या नष्ट होतात. विशेष म्हणजे नॅनो कण कर्करोगाच्या गाठीला रक्तपुरवठा करणाऱ्या विविध रक्तवाहिन्यांची वाढ थांबविण्यासाठी उपयुक्त ठरतात. सर्वसाधारण पेशींना फार मोठ्या प्रमाणावर अपाय न करता केवळ स्तनाच्या कर्करोगांच्या पेशी नष्ट करण्यासाठी नॅनो कणांचा प्रभावी उपयोग होतो. हे संशोधन एन-हेटेरोसायक्लिक कार्बिन व मूलभूत धातूंपासून नवनवीन नॅनो कणांची निर्मिती करणाऱ्या संशोधन क्षेत्राला दिशादर्शक स्वरुपाचे ठरेल.'

या संशोधनात डॉ. पद्मा दांडगे, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. विश्वजित खोत, डॉ. अर्पिता तिवारी यांनी योगदान दिले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांचे संशोधनासाठी मार्गदर्शन मिळाले.

08 DEC 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात स्तनाच्या कर्करोगावर उपचारांसाठी चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती

डॉ. गजानन राशीनकर, डॉ. प्रज्ञा पाटील यांचे संशोधन; भारत व यूकेचे पेटंट

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधक प्रा. डॉ. गजानन राशीनकर व डॉ. प्रज्ञा पाटील यांनी स्तनाच्या कर्करोगावरील हाइपरथर्मिया या महत्त्वाच्या उपचारांसाठी आवश्यक असणाऱ्या चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. त्यांच्या संशोधनाला भारत व आंतरराष्ट्रीय यूके पेटंट मिळाले आहे.

डॉ. गजानन राशीनकर

डॉ. प्रज्ञा पाटील

नॅनो-मॅग्नेटाईटच्या अतिसूक्ष्म रेणूवर विविध रासायनिक अभिक्रिया करून त्यावर एन-हेटेरोसायक्लिक कार्बिनचे (एनएचसी) आवरण चढविण्यात येते. त्याची सोने या धातूसोबत प्रक्रिया करून चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती करण्यात यश मिळाले आहे. हे चुंबकीय नॅनो कण कर्करोगावरील हाइपरथर्मिया या उपचार पद्धतीमध्ये प्रभावीपणे वापरले जाऊ शकतात. पान २ वर

शिवाजी विद्यापीठात स्तनाच्या कर्करोगावर उपचारांसाठी चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती

चुंबकीय नॅनो कणांच्या विशिष्ट संरचनेमुळे ते स्तनाच्या कर्करोगकारक पेशींना जोडले जातात. अशा जोडल्या गेलेल्या नॅनो कणांवर जेव्हा चुंबकीय बल टाकले जाते, तेव्हा सतत बदलत जाणाऱ्या चुंबकीय लहरींच्या प्रभावामुळे हे कण उष्णता उत्सर्जित करतात. या प्रक्रियेदरम्यान साधारणपणे ४० ते ४८ अंश सेंटिग्रेड इतके तापमान निर्माण होते. यामुळे कर्करोगांच्या पेशींची अंतर्गत रचना ढासळते आणि त्या नष्ट होतात. विशेष बाब म्हणजे हे नॅनो कण कर्करोगाच्या गाठीला रक्त पुरवठा करणाऱ्या विविध रक्त वाहिन्यांची वाढ थांबवण्यासाठी देखील उपयुक्त ठरतात. या प्रक्रियेदरम्यान सर्वसाधारण पेशींना फार मोठ्या प्रमाणावर अपाय न करता केवळ स्तनाच्या कर्करोगांच्या पेशी नष्ट करण्याकरिता नॅनो कणांचा प्रभावी उपयोग होतो. हे संशोधन एन-हेटेरोसायक्लिक कार्बिन व मूलभूत धातूंपासून नवनवीन नॅनो कणांची निर्मिती करणाऱ्या संशोधन क्षेत्राला दिशादर्शक स्वरूपाचे ठरणार आहे, असे डॉ. राशीनकर यांनी सांगितले. संशोधनासाठी डॉ. पद्मा दांडगे, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. विश्वजित खोत व डॉ. अर्पिता तिवारी यांनी योगदान दिले. संशोधनासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.

“

शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी अलीकडील काळात केलेले संशोधन व त्यांना प्राप्त झालेले पेटंट यांची क्षेत्रे पाहता ती विद्यापीठाचा समाजोपयोगी संशोधनाचा वसा आणि वारसा सिद्ध करणारी आहेत. डॉ. राशीनकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे संशोधनही याच स्वरूपाचे आहे. कर्करोगावरील संशोधनाच्या क्षेत्रामधील मूलभूत संशोधनाला तसेच भावी संशोधनाला त्यातून चालना मिळेल.

- डॉ. डी. टी. शिर्के,
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

कर्करोगासाठी वापरल्या जाणाऱ्या उपचार पद्धतीत कर्करोगाच्या पेशींबरोबर साधारण पेशीदेखील नष्ट होतात. यामुळे रुग्णांना त्याचे दुष्परिणाम सोसावे लागतात. या संशोधनात तयार केलेले चुंबकीय नॅनो कण हे कर्करोगाच्या पेशींना संपवून टाकतात. या संशोधनामुळे भविष्यात कर्करोगांच्या रुग्णांना उपचारामुळे होणारे परिणाम हे कमी प्रमाणात असतील.

- डॉ. गजानन राशीनकर,
संशोधक, शिवाजी विद्यापीठ

0 8 DEC 2024

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

डॉ. गजानन राशीनकर, डॉ. प्रज्ञा पाटील यांच्या संशोधनाला यूके पेटंट

स्तनाच्या कर्करोगावरील उपचारासाठी चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधक प्राध्यापक डॉ. गजानन राशीनकर आणि डॉ. प्रज्ञा पाटील यांनी स्तनाच्या कर्करोगावरील हायपरथर्मिया या महत्त्वाच्या उपचारासाठी आवश्यक असणाऱ्या चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती करण्यात यश मिळविले. त्यांच्या या संशोधनाला भारतीय, आंतरराष्ट्रीय यूके पेटंटही प्राप्त झाले आहे.

गजानन राशीनकर

प्रज्ञा पाटील

नॅनो-मॅग्नेटाइटच्या अतिसूक्ष्म रेणूवर विविध रासायनिक अभिक्रिया करून त्यावर एन-हेटेरोसायक्लिक कार्बिनचे (एनएचसी) आवरण चढविण्यात येते आणि त्याची सोने या धातूसोबत प्रक्रिया करून या चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. हे चुंबकीय नॅनो कण कर्करोगावरील हायपरथर्मिया या उपचारपद्धतीमध्ये अतिशय प्रभावीपणे वापरले जाऊ शकतात. विशेष बाब म्हणजे हे नॅनो कण कर्करोगाच्या गाठीला रक्तपुरवठा करणाऱ्या विविध रक्तवाहिन्यांची वाढ थांबवण्यासाठी देखील उपयुक्त ठरतात. या प्रक्रियेदरम्यान सर्वसाधारण पेशींना फार मोठ्या प्रमाणावर अपाय न करता केवळ स्तनाच्या कर्करोगांच्या पेशी नष्ट करण्याकरिता या नॅनो कणांचा प्रभावी उपयोग होतो. हे संशोधन एन-हेटेरोसायक्लिक कार्बिन आणि मूलभूत धातूपासून नवनवीन नॅनो कणांची निर्मिती करणाऱ्या संशोधन क्षेत्राला दिशादर्शक स्वरूपाचे ठरणार आहे, असे डॉ. राशीनकर यांनी सांगितले.

या संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. पद्मा दांडगे, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. विश्वजित खोत आणि डॉ. अर्पिता तिवारी यांनीही योगदान दिले. संशोधनासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. कैलास सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.

१ चुंबकीय नॅनो कणाच्या विशिष्ट संरचनेमुळे ते स्तनाच्या कर्करोगकारक पेशींना जोडले जातात.

२ अशा जोडल्या गेलेल्या नॅनो कणांवर जेव्हा चुंबकीय बल टाकले जाते, तेव्हा सतत बदलत जाणाऱ्या चुंबकीय लहरींच्या प्रभावामुळे हे कण उष्णता उत्सर्जित करतात.

३ या प्रक्रियेदरम्यान साधारणपणे ४० ते ४८ अंश सेंटिग्रेड इतके तापमान निर्माण होते. यामुळे कर्करोगांच्या पेशींची अंतर्गत रचना ढासळते आणि त्या नष्ट होतात.

शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी अलीकडील काळात केलेले संशोधन आणि त्यांना प्राप्त झालेले पेटंट यांची क्षेत्रे पाहता ती विद्यापीठाचा समाजोपयोगी संशोधनाचा वसा आणि वारसा सिद्ध करणारी आहेत. या संशोधनामुळे कर्करोगावरील संशोधनाच्या क्षेत्रामधील मूलभूत संशोधनाला तसेच भावी संशोधनालाही त्यातून चालना मिळेल.

- डॉ. टी. टी. शिर्के, कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 DEC २०२४
तरुण भारत

स्तनाच्या कर्करोगावर उपचारांसाठी चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधक प्राध्यापक डॉ. गजानन राशीनकर आणि डॉ. प्रज्ञा पाटील यांनी स्तनाच्या कर्करोगावरील हाइपरथर्मिया (प्लेजीपर्सि) या महत्त्वाच्या उपचारांसाठी चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. त्यांच्या या संशोधनाला भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय युके पेटंटही प्राप्त झाले आहे.

डॉ. राशीनकर म्हणाले, नॅनो-मॅग्नेटाइटच्या अतिसूक्ष्म रेणूवर विविध रासायनिक अभिक्रिया करून त्यावर एन-हेटेरोसायक्लिक कार्बिनचे (एन.एच.सी.) आवरण चढविण्यात येते. त्याची सोने या धातूसोबत प्रक्रिया करून या चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. हे चुंबकीय नॅनो कण कर्करोगावरील हाइपरथर्मिया या उपचार पद्धतीमध्ये अतिशय प्रभावीपणे वापरले जाऊ शकतात. चुंबकीय नॅनो कणांच्या विशिष्ट संरचनेमुळे ते स्तनाच्या कर्करोगकारक पेशींना जोडले जातात. अशा नॅनो कणांवर जेव्हा चुंबकीय बल टाकले जाते, तेव्हा हे कण उष्णता उत्सर्जित करतात. या

■ डॉ. राशीनकर, डॉ. पाटील यांच्या संशोधनाला भारतीय आणि युके पेटंट

डॉ. गजानन राशनकर

डॉ. प्रज्ञा पाटील

प्रक्रियेदरम्यान साधारणपणे ४० ते ४८ अंश सेंटीग्रेड इतके तापमान निर्माण होते. यामुळे कर्करोगांच्या पेशींची अंतर्गत रचना ढासळते आणि त्या नष्ट होतात. कर्करोगाच्या गाठीला रक्तपुरवठा करणाऱ्या विविध रक्तवाहिन्यांची वाढ थांबवण्यासाठी देखील उपयुक्त ठरतात

डॉ. पद्मा दांडगे, डॉ. विश्वजीत खोत, डॉ. अर्पिता तिवारी यांनीही मोलाचे योगदान दिले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.

'समाजोपयोगी संशोधनाचा वसा'

शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी अलीकडील काळात केलेले संशोधन आणि त्यांना प्राप्त झालेले पेटंट विद्यापीठाचा समाजोपयोगी संशोधनाचा वसा आणि वारसा सिद्ध करणारी आहेत. डॉ. राशीनकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे संशोधनही याच स्वरुपाचे आहे. कर्करोगावरील संशोधनाच्या क्षेत्रामधील मूलभूत संशोधनाला तसेच भावी संशोधनालाही त्यातून चालना मिळेल, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली.

08 DEC 2021 दैनिक सिंधुदुर्ग समाचार

शिवाजी विद्यापीठात स्तनाच्या कर्करोगावर उपचारांसाठी चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती

डॉ.गजानन राशीनकर, डॉ. प्रज्ञा पाटील यांच्या संशोधनाला भारतीय आणि युके पेटंट

कोल्हापूर/प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधक प्राध्यापक डॉ. गजानन राशीनकर आणि डॉ. प्रज्ञा पाटील यांनी स्तनाच्या कर्करोगावरील हाइपरथर्मिया (Hyperthermia) या महत्वाच्या उपचारांसाठी आवश्यक असणाऱ्या चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. त्यांच्या या संशोधनाला भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय युके पेटंटही प्राप्त झाले आहे.

डॉ. राशीनकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, नॅनो-मॅग्नेटाइटच्या अतिसूक्ष्म रेणूवर विविध रासायनिक अभिक्रिया करून त्यावर एन-हेटेरोसायक्लिक कार्बिनचे (एन.एच.सी.) आवरण चढविण्यात येते आणि त्याची सोने या धातूसोबत प्रक्रिया करून या चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. हे चुंबकीय नॅनो कण कर्करोगावरील हाइपरथर्मिया या उपचार पद्धतीमध्ये अतिशय प्रभावीपणे वापरले जाऊ शकतात.

चुंबकीय नॅनो कणांच्या विशिष्ट संरचनेमुळे ते स्तनाच्या कर्करोगकारक पेशींना जोडले जातात. अशा जोडल्या गेलेल्या नॅनो कणांवर जेव्हा चुंबकीय बल टाकले जाते, तेव्हा सतत बदलत जाणाऱ्या चुंबकीय लहरींच्या प्रभावामुळे हे कण उष्णता उत्सर्जित करतात. या प्रक्रियेदरम्यान साधारणपणे ४० ते ४८ अंश सेंटीग्रेड इतके तापमान निर्माण होते. यामुळे कर्करोगांच्या पेशींची अंतर्गत रचना ढासळते आणि त्या नष्ट होतात. विशेष बाब म्हणजे हे नॅनोकण कर्करोगाच्या गाठीला रक्तपुरवठा करणाऱ्या विविध रक्तवाहिन्यांची वाढ थांबवण्यासाठी देखील उपयुक्त ठरतात. या प्रक्रियेदरम्यान सर्वसाधारण पेशींना फार मोठ्या प्रमाणावर अपाय न करता केवळ स्तनाच्या कर्करोगांच्या पेशी नष्ट करण्याकरिता या नॅनो कणांचा प्रभावी उपयोग होतो. हे संशोधन एन-हेटेरोसायक्लिक कार्बिन आणि मूलभूत धातूपासून नवनवीन नॅनो कणांची निर्मिती करणाऱ्या संशोधन क्षेत्राला दिशादर्शक स्वरुपाचे ठरणार आहे, असेही डॉ. राशीनकर यांनी सांगितले.

या संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. पद्मा दांडगे, डी.वाय. पाटील विद्यापीठाचे

डॉ. विश्वजीत खोत आणि डॉ. अर्पिता तिवारी यांनीही मोलाचे योगदान दिले. सदर संशोधनासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.

'समाजोपयोगी संशोधनाचा वसा'

शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी अलीकडील काळात केलेले संशोधन आणि त्यांना प्राप्त झालेले पेटंट यांची क्षेत्रे पाहता ती विद्यापीठाचा समाजोपयोगी संशोधनाचा वसा आणि वारसा सिद्ध करणारी आहेत. डॉ. राशीनकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे संशोधनही याच स्वरुपाचे आहे. कर्करोगावरील संशोधनाच्या क्षेत्रामधील मूलभूत संशोधनाला तसेच भावी संशोधनालाही त्यातून चालना मिळेल, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 DEC 2024
पुढारी

दिव्यांग मुलांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करा

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील; शिवाजी विद्यापीठात दिव्यांग विद्यार्थ्यांचा सत्कार

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

दिव्यांग मुलांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन व मनामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी पालकांसह शिक्षक व समाजातील सर्व घटकांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यांच्या हक्कांबद्दल समाजामध्ये जाणीव-जागृती निर्माण होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या यूजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज व समावेशी शिक्षण संसाधन केंद्रामार्फत जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम, उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांची उपस्थिती होती. प्र-कुलगुरू डॉ.पाटील म्हणाले, आपल्याकडे जे नाही, त्याकडे दुर्लक्ष करून आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ध्यास घेतला पाहिजे. जागतिक स्तरावर दिव्यांग असूनसुद्धा अलौकिक यश संपादन करणाऱ्या अनेक व्यक्ती आहेत. या आदर्श व्यक्तींचे स्मरण करून व्यंगावर मात करून पुढे जाण्यासाठी योग्य ती कार्यप्रणाली निर्माण केली पाहिजे. सामाजिक लाभापासून वंचित न राहता समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

कोल्हापूर : दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमात बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.

मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख म्हणाले, दिव्यांग मुलांमध्ये मोठी चेतना व ऊर्जा आहे. कौशल्यपूरकपणे आत्मसात केलेल्या शिक्षणामुळे त्यांच्या कलेला प्रतिसाद मिळत आहे. यूजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिझाबिलिटीज व समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत केले. निलोफर मुजावर, सुप्रिया वडर यांनी सूत्रसंचालन केले.

0 8 DEC 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दिव्यांगांमध्ये सकारात्मकता निर्माण करणे आवश्यक

- प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

दिव्यांग मुलांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन आणि मनामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी पालकांसह शिक्षकांनी आणि समाजातील सर्व घटकांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यांच्या हक्कांबद्दल समाजामध्ये जाणीव-जागृती निर्माण होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या युजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज् आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्र यांच्यामार्फत जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांचा सत्कार केला. यप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

कोल्हापूर : जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विद्यापीठात आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. महादेव देशमुख आदी.

डॉ. पाटील म्हणाले, आपल्याकडे जे नाही, त्याकडे दुर्लक्ष करून आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ध्यास घेतला पाहिजे. जागतिक स्तरावर दिव्यांग असून सुद्धा अलौकिक यश संपादन करणाऱ्या अनेक व्यक्ती आहेत. या आदर्श व्यक्तींचे स्मरण करून आपल्या व्यंगावर मात करून पुढे जाण्यासाठी योग्य ती कार्यप्रणाली निर्माण केली पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी सांगितल्याप्रमाणे या जगामध्ये अशक्य असे काहीही नाही. दिव्यांग शारीरिकदृष्ट्या दुर्बल असले तरी मानसिकदृष्ट्या त्यांनी सुदृढ राहिले पाहिजे. डॉ. महादेव देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले.

दिव्यांग विद्यार्थी-विद्यार्थिनींनी एकल व सामूहिक नृत्यांचे सादरीकरण केले. रतन गुरव यांनी भावगीत सादर केले. युवराज मिठारी यांनी सुरेश भट यांची गझल सादर केली. मान्यवरांच्या हस्ते उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांचा सत्कार केला. युजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिझाबिलिटीज् आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या समन्वयक डॉ. प्रतिमा देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. निलोफर मुजावर आणि सुप्रिया वडर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी हेल्पर्स ऑफ दि हॅन्डीकॅप्ड गणपतराव गाताडे, मतिमंद विद्यालय, कागल, ज्ञानप्रबोधन संचलित अंध विद्यालय, कोल्हापूर येथील विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि शिक्षक सहभागी झाले.

शिवाजी विद्यापीठात स्तनाच्या कर्करोगावर उपचारांसाठी चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती

डॉ. गजानन राशीनकर, डॉ. प्रज्ञा पाटील यांच्या संशोधनाला भारतीय आणि युके पेटंट

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधक प्राध्यापक डॉ. गजानन राशीनकर आणि डॉ. प्रज्ञा पाटील यांनी स्तनाच्या कर्करोगावरील हाइपरथर्मिया (Hyperthermia) या महत्त्वाच्या उपचारांसाठी आवश्यक असणाऱ्या चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. त्यांच्या या संशोधनाला भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय युके

डॉ. गजानन राशीनकर

पेटंटही प्राप्त झाले आहे.

डॉ. राशीनकर यांनी दिलेल्या

डॉ. प्रज्ञा पाटील

माहितीनुसार, नॅनो-मॅग्नेटाइटच्या अतिसूक्ष्म रेणूवर विविध रासायनिक अभिक्रिया करून त्यावर एन-हेटेरोसायक्लिक कार्बिनचे (एन.एच.सी.) आवरण चढविण्यात येते आणि त्याची सोने या धातुसोबत प्रक्रिया करून या चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. हे चुंबकीय नॅनो कण कर्करोगावरील हाइपरथर्मिया या उपचार पद्धतीमध्ये अतिशय प्रभावीपणे वापरले जाऊ शकतात. चुंबकीय नॅनो कणांच्या विशिष्ट संरचनेमुळे



ते स्तनाच्या कर्करोगकारक पेशींना जोडले जातात. अशा जोडल्या गेलेल्या नॅनो कणांवर जेव्हा चुंबकीय बल टाकले जाते, तेव्हा सतत बदलत जाणाऱ्या चुंबकीय लहरींच्या प्रभावामुळे हे कण उष्णता उत्सर्जित करतात. या प्रक्रियेदरम्यान साधारणपणे ४० ते ४८ अंश सेंटीग्रेड इतके तापमान निर्माण होते. यामुळे कर्करोगांच्या पेशींची अंतर्गत रचना ढासळते आणि त्या नष्ट होतात. विशेष बाब म्हणजे हे नॅनोकण कर्करोगाच्या गाठीला रक्तपुरवठा करणाऱ्या विविध रक्तवाहिन्यांची वाढ थांबवण्यासाठी देखील उपयुक्त ठरतात.

या प्रक्रियेदरम्यान सर्वसाधारण पेशींना फार मोठ्या प्रमाणावर अपाय न करता केवळ स्तनाच्या कर्करोगांच्या पेशी नष्ट करण्याकरिता या नॅनो कणांचा प्रभावी उपयोग होतो.

हे संशोधन एन-हेटेरोसायक्लिक कार्बिन आणि मूलभूत धातुंपासून नवनवीन नॅनो कणांची निर्मिती करणाऱ्या संशोधन क्षेत्राला दिशादर्शक स्वरूपाचे ठरणार आहे, असेही डॉ. राशीनकर यांनी सांगितले.

या संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. पद्मा दांडगे, डी.वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. विश्वजीत खोत आणि डॉ. अर्पिता तिवारी यांनीही मोलाचे योगदान दिले.

सदर संशोधनासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.

'समाजोपयोगी संशोधनाचा वसा'

शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी अलीकडील काळात केलेले संशोधन आणि त्यांना प्राप्त झालेले पेटंट यांची क्षेत्रे पाहता ती विद्यापीठाचा समाजोपयोगी संशोधनाचा वसा आणि वारसा सिद्ध करणारी आहेत. डॉ. राशीनकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे संशोधनही याच स्वरूपाचे आहे.

कर्करोगावरील संशोधनाच्या क्षेत्रामधील मूलभूत संशोधनाला तसेच भावी संशोधनालाही त्यातून चालना मिळेल, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली.

वडिलांप्रमाणेच मुलांचाही प्रथमच विधानसभेत सोबत प्रवेश, असाही एक योगायोग

सांगली : वडिलांप्रमाणेच मुलांचाही प्रथमच आमदार म्हणून विधानसभेत प्रवेश घडल्याचा अनोखा योगायोग घडून आलाय. १९९० साली महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री राहिलेले आर आर पाटील आणि अनिल बाबर यांनी प्रथमच आमदार बनून सोबत विधानसभेत प्रवेश केला होता. अगदी तसेच दोघांचे चिरंजीव रोहित पाटील आणि सुहास बाबर यांनी आज प्रथमच आमदार बनून सोबत विधानसभेत प्रवेश केला. त्यामुळे एका अनोख्या योगायोग आणि १९९० सालची एकप्रकारे पुनरावृत्ती झाली असे सध्या बोलले जातेय.

08 DEC 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पदवी प्रमाणपत्र आता इंग्रजीसह मराठी भाषेत

पन्नास हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना दीक्षान्त सोहळ्यात मिळणार द्वैभाषिक प्रमाणपत्र

■ **संदीप खांडेकर :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : यंदापासून शिवाजी विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र मराठी व इंग्रजी भाषेत विद्यार्थ्यांच्या हाती सोपवले जाणार आहे. मुंबई व पुणे विद्यापीठानंतर शिवाजी विद्यापीठात द्वैभाषिक स्वरूपातील प्रमाणपत्र देण्यास सुरुवात होत आहे. त्याबाबतचा निर्णय विद्यापरिषदेत झाला असून, द्वैभाषिक प्रमाणपत्र छापण्यासाठी आवश्यक तयारी करण्यात आली आहे.

विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त सोहळा येत्या जानेवारी २०२५ मध्ये करण्याची तयारी सुरू आहे. त्यात सुमारे पन्नास हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे दिली जातील, असा अंदाज आहे. त्यातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषेतील पदवी प्रमाणपत्र विद्यार्थ्यांच्या हाती पडणार आहे. त्यात काही तांत्रिक चुका राहू नयेत, यासाठी परीक्षा विभाग सतर्कतेने काम करत आहे. द्वैभाषिक प्रमाणपत्र गतवर्षीपासून देण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील होते. मात्र, अधिकार मंडळांची मान्यता, पदवी प्रमाणपत्राचा फॉरमॅट निश्‍चितीसाठीची प्रक्रिया लांबली गेल्याने ते देता आले नाही. यंदा प्रशासनाने अधिकार मंडळांच्या मान्यता घेत दोन समित्या नियुक्त केल्या. त्यांच्याकडून पदवी प्रमाणपत्राचा फॉरमॅट मान्य झाला. तसेच विविध विषयांच्या भाषांतराचा विषय अत्यंत काटेकोरपणे हाताळणे आवश्यक असल्याने, ती नावे मराठीत करण्याची कसरत पूर्ण करावी लागली आहे. प्रमाणपत्रावर आईच्या नावाचा समावेश करण्याचा निर्णय प्रशासनाने यापूर्वीच घेतला आहे. परिणामी द्वैभाषिक प्रमाणपत्रावर ते असणार आहेच. शिवाय विद्यार्थ्याचा पीआरएन नंबर असेल. दरम्यान, पदवी प्रमाणपत्रावर अचूक मराठी नाव येण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध केली आहे. प्रमाणपत्रावर मराठीतील नावे अचूक यावीत व नावातील संभाव्य चुका टाळाव्यात, याकरिता मराठी नावांची पडताळणी करण्यासाठी www.unishivaji.ac.in संकेतस्थळावर login मध्ये नावाचा तपशील ७ ते १३ डिसेंबरदरम्यान उपलब्ध करून दिला आहे, तरी विद्यापीठाकडे अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी संकेतस्थळास भेट देऊन नावाचा तपशील अचूक असल्याची खात्री करावी. तसेच आवश्यक त्या दुरुस्त्या कराव्यात, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.



> ‘द्वैभाषिक स्वरूपातील प्रमाणपत्र देण्यासाठी गतवर्षी पावले उचलण्यात आली होती. मात्र, ती प्रक्रिया लांबल्याने यंदा त्यात कोणतीही कसूर बाकी ठेवली नाही. अधिकार मंडळांच्या मान्यता घेत द्वैभाषिक स्वरूपातील पदवी प्रमाणपत्र तयार करण्यात येत आहे.
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 DEC 2024
तरुण भारत

पदवी प्रमाणपत्रावरील मराठी नावात अचूक दुरुस्ती करा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा वार्षिक दीक्षांत समारंभ जानेवारी २०२५ मध्ये नियोजित आहे. यावर्षीच्या दीक्षांत समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या पदवीप्रमाणपत्रावर मराठी व इंग्रजी मजकूर छापण्यात येणार आहे. त्यामुळे पदवीप्रमाणपत्रावर मराठीतील (देवनागरी) नाव अचुक यावे आणि या नावातील संभाव्य चुका टाळण्यासाठी विद्यापीठामार्फत मराठी नावांची पडताळणी करण्यासाठी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर लॉगइनमध्ये नावाचा तपशिल १३ डिसेंबरपर्यंत उपलब्ध करुन दिला आहे.

- विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर १३ डिसेंबरपर्यंत सुविधा उपलब्ध

संबंधित विद्यार्थ्यांनी विहीत मुदतीत पदवीप्रमाणपत्रावरील मराठीतील नांवाचा तपशिल अचूक असल्याची खात्री करावी तसेच आवश्यक त्या दुरुस्त्या कराव्यात, असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 DEC 2024
लोकमत

पदवी प्रमाणपत्रावर आता मराठीतही नाव येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा वार्षिक दीक्षांत समारंभ जानेवारी २०२५ मध्ये होणार आहे. यावर्षीच्या दीक्षांत समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रावर मराठी व इंग्रजी मजकूर छापण्यात येणार असल्याने पदवी प्रमाणपत्रांवर मराठीतील (देवनागरी) नाव अचूक यावे आणि या नावातील संभाव्य चुका टाळण्यासाठी विद्यापीठामार्फत मराठी नावांची पडताळणी करण्यासाठी www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर नावाचा तपशील उपलब्ध करून दिला आहे.

विद्यार्थ्यांनी ७ ते १३ डिसेंबर अखेर पदवी प्रमाणपत्रावरील तपशील अचूक असल्याची खात्री करावी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 DEC 2024
पुण्यनगरी

विद्यापीठाच्या परीक्षांना ३१ हजार विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी विविध २०९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १८२ केंद्रांवर झाल्या. त्यासाठी ३१ हजार १५५ विद्यार्थी उपस्थित होते, तर तीन जिल्ह्यांतून २१ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद करण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 DEC 2024
सकाळ

आंतरविभागीय विद्यापीठ मैदानी स्पर्धेत नाईट कॉलेजचे यश

कोल्हापूर : बॉक्सिंग स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंसमवेत मार्गदर्शक शिक्षक.

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठातील सिंथेटिक मैदानावर झालेल्या आंतरविभागीय विद्यापीठ मैदानी स्पर्धेत नाईट कॉलेज, कोल्हापूरने दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि तीन ब्राँझपदकांची कमाई केली.

स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंमध्ये अभिषेक देवकाते (५ व १० हजार मीटर धावणे अनुक्रमे रौप्य व सुवर्ण), अजय खाडे (२०० मीटर सुवर्ण, १०० मीटरमध्ये रौप्य, ४ बाय १०० रिलेत रौप्य), साहिल वाघ (लांबउडी ब्राँझपदक, ४ बाय १०० मध्ये रौप्य), संकेत सूर्यवंशी (८०० व १५०० मीटर धावणे ब्राँझ), अक्षय पाटील, प्रशांत मंडले, सोहम पाटील (तिघांनी ४ बाय १०० रिलेत रौप्य) यांचा समावेश आहे.

खेळाडूंना प्राचार्य डॉ. यू. आर. पाटील, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. सुरेश फराकटे, प्रा. प्रफुल पाटील मांगोरे यांचे मार्गदर्शन, संस्थाध्यक्षा रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रासाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, सदस्य अँड. वैभव पेडणेकर, अँड. अमित बाडकर यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 DEC 20[illegible]
पुढारी

विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेला ३१ हजार १५५ विद्यार्थी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला ३१ हजार १५५ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयात शनिवारी बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.ए., एम.कॉम., एमबीए, बॅचलर ऑफ आर्किटेक्ट, बीबीए, बीडीएफसी, बीसीए, एमसीए, बी.व्होक, लॉ आदी २०९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १८२

केंद्रांवर सुरळीतपणे झाल्या. दि. ७ डिसेंबर रोजी भरारी पथकाकडून कोल्हापूर (०८), सांगली (०५), सातारा (०८) असे मिळून २१ गैरप्रकारांची नोंद झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.